**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

दूरध्वनी क्र. २२०१४४२० ई- मेल पत्ता - usest१०.rdd-mh@nic.in

क्रमांक : संकिर्ण.५०२१/प्र. क्र.२१५/आस्था-१० दि.०४/१०/२०२१.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद- औरंगाबाद.
औरंगाबाद.

**विषय :- पदवी / पदविका धारक स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांना कनिष्ठ अभियंता पदी पदोन्नती देताना विभागीय परिक्षेतून सूट मिळणेबाबत मार्गदर्शन**

संदर्भ :- आपले क्र.जिपऔ/ बांध / आस्था-२/कावि/२०२१ , दि.०८/०७/२०२१ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयावरील आपल्या संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या स्थापत्य पदवी / पदविका धारक स्थापत्य अभियंत्रिकी सहायक यांची जिल्हा परिषद सेवेत नामोनिर्देशनाने सरळसेवेने नियुक्ती झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना शासन अधिसूचना दि.०२/०२.२००६ मधील परिशिष्ठ १ (ब) (३) नुसार अर्हता तथा विभागीय परिक्षा देणे बंधनकारक नाही.

तथापि, समावेशनाने नियुक्त झालेल्या स्थापत्य अभियंत्रिकी सहायक यांना अर्हता तथा विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

०२. महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा परिषद सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील तांत्रिक संवर्गाचे कनिष्ठ अभियंता या पदाच्या सेवा प्रवेश नियमामध्ये स्थापत्य अभियंत्रिकी सहायकांना पदोन्नती करिता व्यावसायिक परिक्षा किंवा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची अर्हता परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अशी तरतूद आहे. यावरून असे स्पष्ट होते की, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांनी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे . त्यामुळे , स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांनी जर व्यावसायिक परिक्षा उत्तीर्ण केली असेल अथवा सूट मिळाली असेल तर त्यांना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक नाही.

**आपला,**

**( र. ई. गिरी )**
**अवर सचिव, ग्रामविकास विभाग**

प्रत : निवडनस्ती / आ-१०